२२/५

<u>वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना</u> योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे तसेच, "संत रामराव महाराज समागृहाचे बांधकाम करणे" या कामाचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांकः तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/योजना-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ३० मे २०२२

<u>वाचा:</u>

१. शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इमाव-२००३/प्र.क्र.२०५/मावक-३, दि.०७.०६.२००३
२. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्रमांकः तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१ दि.३०.०१.२०१८
३. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.इमाव-२००८/प्र.क्र.१८०/ मावक-३, दि.१९.१२.२००८
४. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.७९/ अजाक, दि.०६.१०.२०२१

प्रस्तावना:-

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या तांडा / वस्त्यामध्ये मुलभूत सोयी सूविधा उपलब्ध करून देवून या समाजास स्थिर जिवन जगता यावे याकरीता शासन निर्णय संदर्भ क्रमांक ०१ नुसार वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय संदर्भ क्रमांक ०२ नुसार सदरहू योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी उपरोक्त शासन निर्णय संदर्भ ०३ च्या शासन निर्णयान्वये अनुदानाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यास आता बराच कालावधी उलटून गेलेला आहे. यासंदर्भात लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान, अनुदानाची कमाल मर्यादा व कालावधी विचारात घेता, सदर वस्त्यांमध्ये मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे सदर योजनेचा मूळ हेतू साध्य होत नाही. महागाई निर्देशांकात झालेली वाढ, बांधकामाच्या साहित्याचे व मजुरीचे वाढलेले दर ही बाब विचारात घेता, सदर योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची तसेच विमुक्त जाती



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

व भटक्या जमाती घटकांच्या तांडा / वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत "संत रामराव महाराज सभागृहाचे बांधकाम करणे" या कामाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत तांडा / वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत खाली दिलेल्या तक्त्यानुसार पूर्वीच्या अनुदानात वाढ करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | लोकसंख्या | सुधारीत अनुदान रुपये (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | ५१ ते १००पर्यंत | १५.०० |
| २ | १०१ ते १५० | २०.०० |
| ३ | १५१ ते ३०० | २५.०० |

तसेच सदर योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामामध्ये संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदीर या नावाने नवीन कामाचा अंतर्भाव करुन या कामास रू.२५.०० लक्ष इतका निधी मंजुर करण्यात येत आहे.

सदर कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यांत यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकिय मान्यता दिल्यास त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. सदरहू अनुदान शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून मंजूर कामांसाठी लागू राहील. तत्पुर्वी झालेल्या कामांना अतिरीक्त निधीची तरतूद लागू होणार नाही.

संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदीराच्या देखभाल व विनियोगासाठी खालीलप्रमाणे ग्रामस्तरावरील समिती स्थापन करण्यात यावी :-

१. संबंधित ग्रामपंचायती मधील सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक हे पदसिद्ध सदस्य राहतील.

२. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील निवडून आलेले तीन ग्रामपंचायत सदस्य हे या समितीचे सदस्य राहतील. यामध्ये एक महिला सदस्य असणे अनिवार्य राहील.

३. संबंधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेद्वारे गावातील तीन विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील व्यक्तींची सदस्य म्हणून निवड करावी. वरील दोनमध्ये नमूद निर्वाचित महिला सदस्य उपलब्ध न झाल्यास या तीन सदस्यांपैकी एक महिला उमेदवाराची निवड करण्यात यावी. ग्रामसभेतून निवड केलेल्यांपैकी एकाची समिती अध्यक्ष म्हणून निवड करावी.

C:\Users\prafull thakur\Downloads\गिरी गाव.docx

Scanned by CamScanner

२५/५

४. वर नमूद तीन मधील सदस्यांची निवड करतांना तो/ती किमान पदवीधर असावा, सामाजिक कार्याची आवड असणे आवश्यक, त्याचबरोबर तो/ती निर्व्यसनी, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेला व स्वच्छ चारित्र्याचा असणे अनिवार्य राहील.

५. या समितीचा कार्यकाळ हा ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाएवढा राहील. सदरहू समितीचे कर्तव्य व जबाबदारी तसेच इमारत बांधकामाच्या विनियोगाबाबत व देखभालीबाबत सविस्तर सूचना संचालक इतर मागास बहुजन कल्याण,संचालनालय, पुणे यांनी विहीत कराव्यात.

६. सदरहू सभागृह / समाजमंदीरामध्ये कोणताही धार्मिक सण, उत्सव, राजकीय पक्षांच्या बैठका इ. करीता उपयोग करण्यास मज्जाव राहील.

सभागृह / समाजमंदीराच्या बांधकाम करिता संबंधित ग्रामपंचायतीने पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. सदरची जागा ही तांडा तसेच सर्व वस्त्यांसाठी सोयीस्कर असे मध्यवर्ती ठिकाणी असावी.

सभागृह / समाजमंदीराच्या देखभाल व दुरुस्तीसाठीचा खर्च ग्रामपंचायतीच्या २०% निधीतून करण्यासाठी योग्य ते निर्देश ग्रामविकास विभागामार्फत देण्याबाबत त्या विभागास विनंती करण्यात येत आहे.

सदर कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकिय मान्यता दिल्यास त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(कैलास साळुंके)
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद,
३. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. विभागीय आयुक्त सर्व महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
८. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,

C:\Users\prafull.thakur\Desktop\निधी वाट ३०.०५.२०२२.docx

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

९. आयुक्त, सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
१०. संचालक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, महाराष्ट्र राज्य,
१३. मा. उप मुख्यमंत्री, तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव,
१४. मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे खाजगी सचिव,
१५. मा. राज्यमंत्री (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे खाजगी सचिव,
१६. मा. मंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
१७. मा. राज्यमंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
१८. मा. अप्पर मुख्य सचिव (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१९. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/ नगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
२०. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२१. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,

निवडनस्ती ( योजना-१)

Scanned by CamScanner